वाचलेः१. जिल्हा न्यायालय, सातारा कार्यालयीन आदेश जा.क्र. बी/एडीएम/०३/ १२४९/२०२६, दिनांक १२/०२/२०२६.

२. जिल्हा न्यायालय, सातारा कार्यालयीन पत्र जा.क्र. बी/एडीएम/०३/ १२६०/२०२६, दिनांक १२/०२/२०२६.

३. कु. लता खेवजी दाते, कनिष्ठ लिपीक निवड यादी क्र. ६४, रा. मु.पो. खटाव ता. खटाव जि. सातारा यांचा दिनांक १६/०२/२०२६ रोजीचा विनंती अर्ज.

-०-०-०-

उपरोक्त संदर्भ क्र. १ चे आदेशान्वये कु. लता खेवजी दाते, कनिष्ठ लिपीक निवड यादी क्र. ६४, रा. मु.पो. खटाव ता. खटाव जि. सातारा यांची दिवाणी न्यायालय व. स्तर, फलटण येथे तदर्थ हंगामी स्वरुपात प्रथम नियुक्तीने कनिष्ठ लिपीक पदावर नेमणूक करणेत आली आहे. त्यास अनुसरुन कु. लता खेवजी दाते यांना संदर्भ क्र. २ चे नियुक्ती पत्र निर्गमीत करणेत येऊन त्यांना नियुक्ती पत्र मिळालेचे दिनांकापासून सात दिवसाचे आंत नेमणूकीचे ठिकाणी हजर होणेस निर्देशीत केले होते. सदरील नियुक्तीपत्रास अनुसरुन कु. दाते यांनी संदर्भ क्र. ३ चे अर्जान्वये नियुक्ती स्वीकारणेस इच्छूक नसून त्यांचे नांव निवड यादीतून कमी करणेची विनंती केली आहे. यास अनुसरुन निम्नस्वाक्षरीतकार खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहेत.

<u>कार्यालयीन आदेशः-</u>

कनिष्ठ लिपीक पदाकरिता निवड केलेल्या उमेदवारांच्या निवड यादीतील अनुक्रमांक ६४ चे उमेदवार कु. लता खेवजी दाते यांची दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, फलटण या कार्यालयाचे आस्थापनेवर दिनांक १५/०२/२०२६ चे कार्यालयीन वेळेपूर्वी पासून कनिष्ठ लिपीक पदावर कार्यालयीन आदेश क्र. बी/ एडीएम/ ३/ १२४९/ २०२६ दिनांक १२/०२/२०२६ अन्वये नेमणूक करणेत आली होती. ती नेमणूक उपरोक्त संदर्भ क्र. ३ चे विनंती अर्जास अनुसरुन याद्वारे रद्द करणेत येऊन त्यांचे कनिष्ठ लिपीक पदाच्या निवड यादीतील अनुक्रमांक ६४ येथे असलेले नांव या आदेशान्वये कमी करणेत येत आहे.

कु. लता खेवजी दाते यांचे नांव कनिष्ठ लिपीक पदाकरीता निवड केलेल्या उमेदवारांच्या निवड यादीतून कमी केले असल्याने त्यांची कनिष्ठ लिपीक

पदावरील केलेली नेमणूक रद्द करण्यात येत आहे. त्यामुळे दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, फलटण या आस्थापनेवरील एका कनिष्ठ लिपीकाचे पद रिक्त झाले आहे. सदरचे पद तुर्त रिक्त ठेवून, ते रिक्त पद भरणेबाबतचा आदेश नंतर निर्गमित करणेत येईल याची नोंद घेणेत यावी.

सदरील आदेशाचा अंमल सत्वर लागू करणेत येत आहे.

17.02.2026

जिल्हा न्यायालय, सातारा.
दिनांकः- १७/०२/२०२६.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
सातारा.

-०-०-०-

जा.क्र. बी/एडीएम/०३/१५२३/२०२६

प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर :-

०१. मा. दिवाणी न्यायाधीश व.स्तर, फलटण.
०२. अधिक्षक, प्रशासन/न्यायिक, जिल्हा न्यायालय, सातारा.
०३. कु. लता खेवजी दाते, रा. मु.पो. खटाव ता. खटाव जि. सातारा ई-मेलद्वारे.
०४. संगणक विभाग, जिल्हा न्यायालय, सातारा संकेतस्थळावर प्रसिध्द करणेकरीता.

जिल्हा न्यायालय, सातारा.
दिनांकः- १७/०२/२०२६.

आदेशावरुन

प्रबंधक
जिल्हा न्यायालय,सातारा